# ॥ प्रेस नोट ॥

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराचे देयके तयार करण्यात आले असून सदर देयके वाटप करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

तथापि, मालमत्ता कर विषयक नागरीकांच्या तक्रारी/ हरकती/ सुचना असल्यास त्याचे निराकरण करणेकरीता मा. आयुक्त यांनी दि. २४/०४/२०२५ रोजी सर्व प्रभाग कार्यालय येथे **"तक्रार निवारण दिन"** चे आयोजन केलेले आहे.

तरी, नागरीकांनी या सेवेचा लाभ घेऊन मालमत्ता कर विषयक तक्रारी/ हरकती/ सुचना असल्यास संबधित प्रभाग कार्यालयात आपली तक्रारी/ हरकती/ सुचना लेखी स्वरुपात सादर करावी.

तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेने दि. ०१/०४/२०२५ ते दि. ३०/०६/२०२५ अखेर पर्यंत विहीत मुदतीत आगाऊ भरणा केल्यास चालु मागणी रक्कमेवर ५% (मोठ्या निवासी मालमत्ता कर, शासकीय शिक्षण कर, शासकीय रोजगार हमी कर, घनकरचरा शुल्क वगळुन इतर सर्व करांवर) व दि. ०१/०७/२०२५ ते दि. ३१/०७/२५ अखेर पर्यंत ३% सवलत देण्याचे जाहिर केलेले आहे.

मालमत्ता धारकांनी आपल्या मालमत्ता कराचा भरणा रोख स्वरुपात अथवा मालमत्ता कराचा भरणा मोबाईलव्दारे करण्याकरीता महानगरपालिकेने विकसीत केलेल्या **My MBMC** या ॲपव्दारे तसेच **www.mbmc.gov.in** या संकेतस्थळावरुन मालमत्ता कराचा भरणा करणेस सोईचे होणार असल्याने नागरीकांना सदर सुविधेचा जास्तीत जास्त वापर करणे बाबत आवाहन करण्यात येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेस आवश्यक कर्तव्य व सेवा पुरविणेकरीता आवश्यक निधीची कमतरता पडु नये याकरीता मालमत्ता कराचा भरणा करणे ही आपली जबाबदारी असुन आपल्या शहराचा चांगल्या प्रकारे विकास होणेकरीता नागरीकांनी मालमत्ता कराचा भरणा करुन महानगरपालिकेस सहकार्य करणे बाबत महानगरपालिका आयुक्त श्री. राधाबिनोद शर्मा, भा.प्र.से. यांनी जाहिर आवाहन केले आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

# जाहीर आवाहन

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता कर भरणा करणाऱ्या नागरिकांना आवाहन करण्यात येते की आपल्या नावे असलेल्या मालमत्ता कर विषयक अडचणी / समस्या / हरकती तसेच आपल्या मालमत्ता कर नावात बदल/ मालमत्ता हस्तांतरण / मालमत्ता कर नावात दुरुस्ती व इतर मालमत्ता कर भरणा तक्रार / निवेदन करण्यासाठी **दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता तक्रार निवारण दिन** आयोजित करण्यात आलेला आहे. तरी आपल्या रहिवासी क्षेत्रातील खालील नमूद ठिकाणी उपस्थित राहून आपले तक्रार / निवेदन अर्ज सादर करावेत.

## प्रभाग समिती क्रमांक ०१

- राजीव गांधी नागरी सुविधा केंद्र, तळमजला, मुख्य कार्यालय, मिरा-भाईंदर महानगरपालिका, भाईंदर (प.) दुरध्वनी क्र. २८१९३०२८ / २८१९२८२८
- शुभम आर्केड, दुसरा मजला, मीरा हॉस्पिटल शेजारी डी. मार्ट परिसर, भाईंदर (प). ता. जि. ठाणे ४०११०१. दुरध्वनी क्र. २८१४०००२
- राम मंदिर शेजारी, मुर्धे, दुरध्वनी क्र. २८१४४७९३
- डोंगरी, भाईंदर पश्चिम, दुरध्वनी क्र. २८४५२४४८
- उत्तन भाईंदर पश्चिम, दुरध्वनी क्र. २८४५२३८३

## प्रभाग समिती क्रमांक ०२

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, भाईंदर पश्चिम, ता. जि. ठाणे

## प्रभाग समिती क्रमांक ०३

- मोरेश्वर नारायण पाटील भवन, दुसरा मजला, मराठी शाळा क्र. ०६, तलाव, भाईंदर पूर्व, ता. जि. ठाणे दुरध्वनी क्र. २८१७८५२२

## प्रभाग समिती क्रमांक ०४

- स्व. विलासराव देशमुख भवन, जांगीड एनक्लेव, लक्ष्मी पार्क, कनाकिया रोड, मिरारोड (पूर्व), ता. जि. ठाणे
- रेती बंदर कार्यालय, घोडबंदर दुरध्वनी क्र. २८४५४०२४/२८१७८५२२

## प्रभाग समिती क्रमांक ०५

- समाज मंदिर, आरक्षण क्र. १७८, ए.पी.जी. अब्दुल कलाम उद्यान शेजारी, हैदरी चौक, नया नगर, मिरारोड (पु) ता. जि. ठाणे

## प्रभाग समिती क्रमांक ०६

- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे भवन, राष्ट्रीय महामार्ग क्र. ०८, काशिमीरा पोलीस स्टेशनच्या मागे, काशिमीरा, ता. जि. ठाणे
- मराठी शाळा क्र. ०९ चेणे गांव

वरील ठिकाणी आपले तक्रार अर्ज / निवेदन स्वीकारले जातील. तसेच, प्राप्त तक्रारींवर निवारण करण्यात येईल

**राधाबिनोद अ. शर्मा** (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**सुवर्ण संधी!** **सुवर्ण संधी!** **सुवर्ण संधी!**

# मालमत्ता कर विभाग




- 30 जून 2025 पुर्वी मालमत्ता कराची संपूर्ण रक्कम भरल्यास **5% सूट**
- 31 जुलै 2025 पुर्वी मालमत्ता कराची संपूर्ण रक्कम भरल्यास **3% सूट**
- गृहसंस्थांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग प्रकल्प व सोलर वॉटर हीटिंग सिस्टीम बसवून सुरु ठेवल्यास मालमत्ता करातून **5% सूट**

31 जुलै 2025 नंतर नियमानुसार महिना **2% व्याज** लागेल याची नोंद घ्यावी.

## सवलत योजनेचा लाभ घ्या!
## आपल्या मालमत्ता कराचा भरणा करा.

1) My MBMC Mobile App Playstore किंवा Appstore मधून डाऊनलोड करुन मोबाईल द्वारे मालमत्ता कराचा भरणा करता येईल.
2) https://pg.mbmc.gov.in येथून ऑनलाईनद्वारे मालमत्ता कराचा भरणा करता येईल.
3) चेक किंवा डी.डी. मिरा भाईंदर महानगरपालिका / Mira Bhaindar Municipal Corporation या नावाने देण्यात यावा.

टिप : वरील सूट शासकीय कराव्यतिरिक्त इतर करांवर सूट अनुज्ञेय राहील.

**राधाबिनोद अ. शर्मा** (भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

in / f Mira Bhayandar Municipal Corporation | mbmconline | My_MBMC | mbmconline | mbmc.gov.in